## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. १६ ऑक्टोबर २००८ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १११ वी बैठक शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २००८ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ११) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १२) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १३) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १६) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १७) | मा. श्री. दिलीप शिंदे,उपसचिव,गृ.नि.विभाग | निमंत्रक |
| १८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १९) | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव यांनी मा.सभापती व मा. सदस्य यांचे स्वागत करुन मंडळाची १११ वी बैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले. व मंडळाच्या दि.२८ ऑगस्ट २००८ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी मंडळासमोर सादर केले.

**बाब क्रमांक : १११/१ -**

विषय- दि.२८ ऑगस्ट २००८ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

९७.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते २५ वर सादर करण्यात आले आहे. तसेच बैठकीच्या सुरुवातीस मा. सभापती यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडील बैठकीसाठी त्यांना, मा.सदस्य आमदार श्री.बशीर पटेल व मा. मुख्य अधिकारी यांना हजर राहावे लागल्यामुळे आजची मंडळाची बैठक उशीरा सुरु करीत असल्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, डी.सी.आर. च्या दरामध्ये बाजारभावाप्रमाणे वाढ व्हावी अशी मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांची मागणी होती. याबाबत मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव झाला होता व सदर ठरावास प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर शासनाकडे पाठविण्यात आला होता. व सदर ठराव मा. मुख्यमंत्री यांनी आजच्या बैठकीत मंजूर केला आहे. व एस्कलेशन क्लॉज निविदांमध्ये समाविष्ट करण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले आहे. अशाप्रकारे एक महत्वाचा व ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी अशीही माहिती दिली की, दुरुस्तीच्या खर्चाची मर्यादा रु.१२०० वरुन रु.२०००/- करण्याची मागणी देखील मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केली होती. शासनाचे उप सचिव श्री. दिलीप शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे दोन आठवडे अगोदरच दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु.१२०० वरुन रु.२०००/- झाल्याचा शासन निर्णय जारी झाला आहे.

मा. सभापती यांनी अशीही माहिती दिली की, कलम ३३ (७) व ३३ (९) अंतर्गत कमीत कमी ३०० चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे बांधण्याचा निर्णय दिवाळीपूर्वी जाहीर करण्याचे आश्वासन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहे. या निर्णयामुळे क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून पुनर्बांधणी योजना राबविणे ~~सहजशक्य होईल.~~

मा. सभापती यांनी दिलेल्या वरील माहितीनंतर मा.सदस्य आमदार श्री.बशीर पटेल यांनी अभिनंदनाचा ठराव मांडताना सांगितले की, मा. सभापती यांनी, त्यांनी स्वत: व मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी सतत केलेल्या पाठपुराव्यास यश आले व वरील तिन्ही प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केले याबद्दल सर्व सदस्यांच्या वतीने मा. मुख्यमंत्री महोदयांचा, मा. सभापती, मा.सदस्य व अधिकारी यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. व सदर अभिनंदनाचा ठराव मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविण्यात यावा अशी सूचना केली.

मा. सभापती यांनी मंडळाचे मा. मुख्य अधिकारी श्री. तानाजी सत्रे यांची सचिव पदावर बढती मिळाल्याबद्दल मंडळाच्या सर्व मा.सदस्यांच्यावतीने त्यांचे अभिनंदन केले.

सचिव यांनी माहिती दिली की, १०८ व्या बैठकीत व ११० व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्याचे दोन प्रस्ताव मंजूर करुन ठराव करण्यात आले होते परंतु सदर ठराव स्थायी करण्याचे अनावधनाने राहून गेले होते. म्हणून पृ.क्र.२७ वरील शुध्दीपत्रकान्वये ठराव क्र.११०/९१२ व ठराव क्र. ११०/९१३ स्थायीकरण करण्यास मंडळाच्या मंजूरीसाठी सादर

करण्यात आले आहेत. वरील माहितीनंतर सर्वानुमते शुध्दीपत्रकान्वये स्थायीकरणासाठी सादर करण्यात आलेले ठराव सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

सविस्तर चर्चेअंती ११० व्या बैठकीचे कार्यवृत्त सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत श्री.हडदरे, मुख्य अभियंता /प्राधिकरण यांनी वर्षानुवर्षे संक्रमण शिबीरात राहणा-या लोकांना त्याच ठिकाणी ३०० चौ.फू.ची घरे बांधून ती त्यांना मालकी हक्काने देण्याचा व अशाप्रकारे ५००० घरे बांधण्याचा तसेच ज्या जून्या इमारती पडल्या आहेत त्या ठिकाणी इमारत पुनर्रचित होणार नसल्यामुळे भूखंड पडून आहेत त्या भूखंडावर तात्पुरती संक्रमण शिबीरे बांधण्यात येणार असल्याचा प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे सांगितले होते, तरी सदर प्रस्तावांबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली अशी त्यांनी विचारणा केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, वरील दोन्ही ठराव प्राधिकरणात मंजूर झाले असून पहिल्या प्रस्तावानुसार कुलाबा संक्रमण शिबीर येथे २०० घरे बांधण्यात येणार आहेत. दुस-या प्रस्तावाबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, पुनर्रचित न होणा-या इमारतीच्या भूखंडावर १५० चौ.फू.ची तात्पुरती संक्रमण शिबीरे बांधण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला असून भूसंपादन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाचे गाळे १० वर्षे विकता येत नाहीत. मास्टर लिस्टवर सुमारे २०-२५ वर्षांपासून लोक संक्रमण शिबीरात आहेत. जर त्यांनी त्यांचे हक्क विकले असतील तर त्यांचा गाळे विकण्याचा हक्क विचारात घेऊन गाळे नियमित करु शकतो का ? तसेच काही शुल्क घेऊन असे नियमितीकरण केल्यास मंडळास निधी उपलब्ध होईल. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, नियमानुसार संक्रमण गाळे विकता येत नाहीत. तरीही जे गाळे विकले गेले आहेत ते कायदेशीररित्या नियमित कसे करता येतील याबाबत तपासणी चालू असून अद्याप निर्णय झालेला नाही.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील बैठकीत माहिती दिल्यानुसार पी.एम.जी.पी.च्या ९ इमारतींचा समुह पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे का ? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी प्रायोगिक तत्वावर समुह पुनर्विकास योजना करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे अशी माहिती दिली.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी पी.एम.जी.पी.च्या देखभालीसाठी रु.१५ कोटी मंजूर करण्यात आले होते त्यापैकी रु.११ कोटी खर्च झाले असून रु.४ कोटी शिल्लक असून त्या शिल्लक रक्कमेमध्ये इतर इमारतींची दुरुस्ती सर्वे करुन करण्यात येणार <del>आहे</del> . त्याबाबत पुढे काय झाले अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, शासनाने वनटाईम रिपेअरसाठी इमारतींच्या यादीसह म्हाडास निधी दिला होता. त्यानुसार ' वनटाईम रिपेअरर्स ' मधून इमारतींची दुरुस्ती करण्यात आली. उर्वरित रु.४ कोटी मधून दुरुस्ती करण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता <del>घेण्यात येईल</del>. 'वनटाईम रिपेअरर्स' मधून ज्या इमारतींची दुरुस्ती करण्यात येणार होती त्यांच्यासाठी अट घालण्यात आली होती की, दुरुस्तीनंतर <del>संस्थेने</del> इमारत ताब्यात घ्यावी. परंतु <del>संस्था</del> इमारत मालकी तत्वावर ताब्यात घेण्यास तयार नाही. कोणत्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करावयाचे आहे, कोणत्या इमारतीला दुरुस्तीची गरज आहे यांची माहिती घेण्यात येत आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, पी.एम.जी.पी.च्या इमारती धोकादायक झालेल्या आहेत. म.न.पा.तर्फे ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन व पेवर <del>ब्लॉकिंग</del> करण्याचे काम म्हाडाची परवानगी न घेता करण्यात येत आहे. तसेच म्हाडाने संपादित केलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जागेवर देखील काम करण्यासाठी म.न.पा.ने परवानगी घेतली नाही तर तर म्हाडाचे अस्तित्वच राहणार नाही. आणि जर काही बदल झाले तर त्याची जबाबदारी मंडळावर येणार. यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, म.न.पा.ला विभागाचा जो निधी <del>जे.ऐन. आर</del>.च्या माध्यमातून मिळतो त्यामधून ते मंडळाच्या परवानगी शिवाय किंवा एन.ओ.सी न घेता कामे करतात ते योग्य नाही.

यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी अशी माहिती दिली की, मा. सभापती यांच्या सूचनेनुसार याबाबत संबंधित विभागीय म.न.पा.अधिका-यांना भेटून तसेच पत्र पाठवून कामे करण्यापूर्वी म्हाडाची परवानगी घेणे आवश्यक आहे असे सांगण्यात आले आहे. यावर मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी व मा. सदस्य किसन जाधव यांनी असे सुचविले की, पाणी,ड्रेनेजच्या जून्या लाईन दुरुस्त करण्यात येत आहेत कि नवीन लाईन टाकण्यात येत आहे हे प्रथम लक्षात घ्यावे. नवीन लाईन टाकण्यासाठी मंडळाच्या परवानगीची आवश्यकता आहे अनावश्यक काम होऊ नये व डूप्लीकेशन ऑफ वर्क होऊ नये याची तपासणी अधिका-यांनी करुन घेणे आवश्यक आहे. म्हणून आयुक्तांना पत्र लिहिण्यापूर्वी काळजीपूर्वक व स्पष्ट लिहिणे आवश्यक आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी <del>याबर विभागीय अधिका-यांना खर्च करण्यापूर्वी कशाप्रकारची</del> कामे <del>करण्यात</del> येणार आहेत याची माहिती <del>मंडळाच्या अधिका-यांना दिल्यानंतर त्यांनी</del> ती कामे <del>करावीत असे</del> म.न.पा. आयुक्तांना पत्र लिहून कळविण्यात येईल असे सूचित केले.

मा. सदस्य किसन जाधव यांनी पी.एम.जी.पी.च्या इमारतींचा स्ट्रक्चरल रिपोर्ट बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता श्री. लोहकरे,उ.मु.अभियंता यांनी माहिती दिली की, स्ट्रक्चरल कन्सलटन्टची नेमणूक करण्यात आली आहे.ज्या इमारतींची अवस्था खराब आहे अशा १६ इमारती आढळून आल्या असून कन्सलटन्ट नेमून त्यांचे ऑडीटचे काम त्वरित हाती घेण्यात येत आहे. या कामासाठी सुमारे एक महिन्याचा अवधी लागेल.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, ३४,बी, गिरगाव या इमारतीस पावसाळयापूर्वी भेट देण्यात आली होती. त्या इमारतीतील रहिवाशांना व्हेकेशन नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तरी त्या रहिवाशांना अद्याप पर्यायी जागा मिळालेल्या नाहीत. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी रहिवाशांना त्यांच्या पसंतीचे गाळे मिळाले नाहीत तर ते घेत नाहीत असे निदर्शनास आणले असता रहिवाशांना देण्यात येणारे गाळे राहण्याच्या लायकीचे नसतात. गाळयांची अवस्था अतिशय वाईट असते. गाळयामध्ये लाईट नसते,. नळाला पाणी येत नसते, अन्य सुविधा उपलब्ध नसतात. किंवा त्या गाळयात घुसखोर आधीपासूनच रहात असतो. असे गाळे रहिवाशी घेणार कसे ?

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, रिक्त गाळयांची यादी जाहीर करण्यापूर्वी गाळे प्रत्यक्ष रिक्त आहेत किंवा नाहीत याची प्रत्यक्ष पाहणी न करताच यादी जाहीर करण्यात आल्यामुळे तो घोळ झाला आहे. म्हणून संक्रमण गाळे विभागाची एक स्वतंत्र बैठक घेण्यात आली होती. आता प्रत्यक्ष गाळे तपासण्यात आले असून रहिवाशांना संक्रमण गाळयांचा ताबा देण्याची जबाबदारी संक्रमण गाळे विभागाच्या अधिका-यांची व व्हेकेशन नोटीस देणा-या अधिका-याची आहे.

मा. सभापती यांनी धारावी येथे किती संक्रमण गाळे उपलब्ध होणार आहेत ? अशी विचारणा श्री. पाटील, उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांना केली असता श्री.पाटील.उपमुख्य अभियंता यांनी अजून चार इमारती उपलब्ध होणार असून सुमारे २५० संक्रमण गाळे मिळतील अशी माहिती दिली. यावर मा. सभापती यांनी धारावी येथे उपलब्ध होणा-या गाळयांचे ताबे घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा अशा अधिका-यांना सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.हेमराज शहा यांनी २०-२५ वर्षांपासून संक्रमण शिबीरात राहणा-या लोकांना पुनर्रचित इमारतीत गाळे देण्यात यावेत अशी सूचना केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, ज्यांच्या इमारती पुनर्रचित होत नाहीत त्या इमारतीतील रहिवाशांना बृहतसूचीवर घेण्यात येऊन उपलब्ध पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप करण्यात येते. परंतु भूसंपादन कार्यवाही, नकाशे बनवून मंजूरी घेणे, ठेकेदार नेमणे, इमारत बांधून पूर्ण करणे व म.न.पा.कडून भोगवटा परवाना मिळणे इत्यादी प्रक्रियांसाठी सुमारे १५ ते २० वर्षांचा कालावधी लागतो. जर काही न्यायालयीन प्रकरण उद्भवले तर आणखी कालावधी लागतो. त्यामुळे

रहिवाशांना किती काळ संक्रमण शिबीरात राहावे लागेल याची कल्पना नसते. म्हणून कायद्यात दुरुस्ती करण्याचा ठराव प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला असून तो ठराव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. कायद्यातील सदर दुरुस्तीनुसार रहिवाशांनी त्यांच्या मुळ इमारतीतील जागेचा हक्क सोडून बृहतसूचीवर त्यांचे नाव घेऊन अन्य पुनर्रचित इमारतीत गाळा घेऊ शकतो. दरम्यान मार्गदर्शक सूचना बनविण्यात येत आहेत व शासनाची मान्यता मिळताच सुधारित दुरुस्तीची अंमलबजावणी करण्यात येईल. मा. मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, सध्या जे रहिवाशी मास्टर लीस्टवर आहेत त्यांना तात्काळ घरे देऊ शकतो. अशा ७१ रहिवाशांना न्यायालयाच्या आदेशानुसार गाळे वितरण करण्यात आले आहे व त्याची यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द केली. परंतु गाळे वितरण स्विकारण्यास रहिवाशी पुढे आले नाहीत. जे १० रहिवाशी पुढे आले ते सुध्दा गाळे बदलून मागत आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी मास्टर लीस्टवरील जे गाळेधारक पात्र आढळतील त्यांच्याकडून संक्रमण शिबीरातील गाळे खाली करुन पुनर्रचित इमारतीत गाळे वाटप करण्यात येईल.

पात्र अपात्रतेच्या मुद्याबाबत मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी एका रहिवाशाचे उदारहरण देऊन असे निदर्शनास आणले की, सदर रहिवाशी १९७१पासून संक्रमण शिबीरात राहतो. त्या रहिवाशास २००४ साली सुनावणी देण्यात आली होती. कोर्टाच्या आदेशानंतर मास्टर लीस्टनुसार गाळे वितरण घेण्यासाठी कार्यालयात येऊन संबंधित अधिका-यांना भेटला. तेव्हा त्याचे नाव मास्टर लीस्टवर नव्हते असे आढळून आले. म्हणून त्या रहिवाशाने व्हेकेशन नोटीस आणून दाखविली असता त्याच्याकडील व्हेकेशन नोटीस व विभागीय कार्यालयातील व्हेकेशन नोटीस जुळत नसल्याचे सांगण्यात आले. अशाप्रकारचे रहिवाशी संक्रमण शिबीरात वर्षानुवर्षे रहात असून त्यांच्याकडे भाडे पावत्या वगैरे कागदपत्रे आहेत. असे रहिवाशी घुसखोर नसतील तर त्यांना मास्टरलीस्टनुसार वितरण करण्यात यावे.

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी पात्र रहिवाशावर अन्याय होता कामा नये परंतु अपात्र व्यक्तीला गाळा मिळता कामा नये या दृष्टीकोनातून तपासणी करण्याची आवश्यकता आहे असे सांगून एका व्यक्तीने त्याच्याकडील मुळ कागदपत्रांव्दारे मास्टर लीस्टवरुन १९९२ साली वाटप करुन घेतले व १९९९ साली मुलाने ती व्यक्ती त्याचे वडील नसल्याचे व त्याचे वडील १९७७ सालीच मृत्यु पावल्याचे सांगितले.अशी फसवणुक करणारे लोक आहेत असे निदर्शनास आणले.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी चिखलवाडी येथील ए.आर.पी. इमारतीतील रहिवाशांना हलविण्याबाबत मागील काही महिन्यांपासून पाठपुरावा करुनही कार्यवाही होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, वंजारी मंडळाच्या ३३ लोकांना पुनर्रचित इमारतीत हलविण्यात येणार आहे. परंतु

लाईट,पाण्यासाठी १५ ते २० दिवस लागतील. त्यानंतर ए.आर.पी. इमारतीतील रहिवाशांना तेथे हलविण्यात येईल. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांना सूचना दिल्या की, या महिनाअखेर ए.आर.पी. इमारतीतील रहिवाशांना हलविण्यात यावे अशा सूचना दिल्या. [illegible]

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी एस.आर.ए.च्या विकासकांना १ ते २ वर्षांसाठी संक्रमण गाळे दिले होते व ५-७ वर्षे झाली तरी त्यांनी ते गाळे मंडळाच्या ताब्यात दिलेले नाहीत. याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, या विषयाबाबत एस.आर.ए.च्या संबंधित अधिका-यांची बैठक घेण्यात आली असून विकासकांकडून गाळे मंडळाच्या ताब्यात घेण्यासाठी कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिका-या दिल्या आहेत व त्याप्रमाणे कारवाई सुरु आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी संक्रमण शिबीराच्या देखभालीसाठी भाडेवसुलीकारांना राहण्यासाठी संक्रमण शिबीरात गाळे देण्याचे ठरले होते असे निदर्शनास आणून. कोणत्या भाडेवसुलीकारांना कोणत्या संक्रमण शिबीरात गाळा देण्यात आला आहे याची माहिती रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात यावी अशी सूचना केली. व मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी भाडेवसुलीकार रहिवाशांसाठी केव्हा उपलब्ध असेल याची माहिती फलकाव्दारे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणले. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या की, भाडेवसुलीकाराचे नाव, रहिवाशांसाठी ते कधी उपलब्ध असतील ती वेळ , भाडेवसुलीकाराचा भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहिती कार्यालयातर्फे रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कुलाबा संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाबाबत विचारणा केली असता मा.सभापती यांनी माहिती दिली की, कुलाबा संक्रमण शिबीराच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राधिकरणात मंजूर होऊन शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. मध्यंतरी पुनर्विकासासाठी रहिवाशांचे स्थलांतर करण्यात येत आहे. रहिवाशांच्या माहितीसाठी रहिवाशाना मंडळाच्या ठरावाची प्रत देण्यात येईल व रहिवाशांची बैठक घेऊन त्या बैठकीस मंडळाचे अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधींना उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात येईल.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी संक्रमण शिबीरात शाळा, दवाखाने वगैरे समाजोपयोगी काम करीत असणा-या सामाजिक संस्थांना गाळे देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे ठरवून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावा अशी सूचना केली व मा. सभापती यांनी जे अतिरिक्त गाळे गैरसोयीचे असल्यामुळे रहिवाशी घेण्यास तयार नाहीत व ते असेच पडून आहेत. अशा गाळयांत घुसखोरी होऊ नये म्हणून अशा गाळयांची यादी तयार करुन विक्री

करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करुन वरील दोन्ही विषयाबाबत पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा. मुख्य अधिकारी यांना दिल्या.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, पिंपळेश्वर इमारतीतील काही रहिवाशांनी त्यांच्या गाळयाच्या बाजूचा रिक्त असलेला गाळा त्या गाळयाचे बाहेरुन कुलुप तसेच ठेऊन गाळयास आतून दरवाजे पाडून वापरत आहेत . अशा रहिवाशांवर त्वरित पोलीसात तक्रार दाखल करण्यात यावी.

**<u>बाब क्रमांक १११/ २</u>** (दक्षिण परीमंडळ)

विषय- अ) दक्षिण परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २९ ते ३७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

दक्षिण परीमंडळातील ३० उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.४,६६,०२,०२६/- व निव्वळ रक्कम रु..१,९९,९६,९६९/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक १११/९१४</u>**

दक्षिण परीमंडळातील एकूण ३० उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

-----xox-----

**<u>बाब क्रमांक १११/ २</u>**

**ब)** विषय- इ.क्र.११, कुसुम सदन महालक्ष्मी मंदिर कंपाऊंट ८८ (३) अ रद्द करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

चर्चेअंती प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक १११/९१५**

इ.क्र.११, कुसुम सदन महालक्ष्मी मंदिर कंपाऊंट या इमारतीस दिलेले ' ८८ (३) अ ' चे प्रमाणपत्र सर्वानुमते रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---oo---

**बाब क्रमांक १११/ २**

**क)** नियंत्रण कक्षाबाबत माहीती.

---

उपरोंक्त माहीती पृ.क्र.४१ ते ४५ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी नियंत्रण कक्ष विभागाचे वाहन नादुरुस्त चांगले वाहन उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी अधिका-यांची कार्यक्षमता वाढण्यासाठी सर्व उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना वापरणसाठी वाहने उपलब्ध होण्यासाठी भाडयाने वाहने घेण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणात सादर करण्यात आला आहे अशी माहीती दिली. तोपर्यंत नियंत्रण कक्षाचे वाहन बदलून दुसरे वाहन उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले.

**बाब क्रमांक १११/३**

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या
मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी
प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४७ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. उत्तर परीमंडळातील .४८ उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..८,३६,७६,५२७/- व निव्वळ रक्कम रु..४,००,४१,०५५/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १११/९१६**

उत्तर परीमंडळातील एकूण ४८ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

----------xox----------

**बाब क्रमांक १११/ ४**

विषय- मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१ अंतिम भुखंड क्र.१०६३, टी.पी.एस-४ माहीम विभाग वाकडी चाळ
२ भुकर पाहाणी क्र.६००/१०, प्लॉट क्र.७७९, माटुंगा विभाग दारुवाला हाऊस
३ भुकर पाहाणी क्रमांक ३/१६३४ भायखळा विभाग मोतलीबाई स्ट्रिट
४ भुकर पाहाणी क्र.६०८ आणि ६०९ गिरगाव मुन्शी बिल्डींग
५ भुकर पाहाणी क्र.१०४६ आणि १०४७ खेतवाडी मिर्झा बिल्डींग
६ भुकर पाहाणी क्र.१४१२ आणि १४१३ भायखळा विभाग सैफी मंझील आणि मुर्तुजा मंझील
७ भुकर पाहाणी क्र.१८११ आणि १८१२ भायखळा विभाग जरीवाला बिल्डींग व कुड्डुसकर बिल्डींग
८ भुकर पाहाणी क्र.१७९४ माहीम विभाग, डॉ.एम.बी.राऊत रोड दादर (प) मुंबई नंदादिप बिल्डींग
९ भुकर पहाणी क्र.१६८ / ७४ परेल शिवडी विभाग, "कावराना बिल्डींग"
१० भुकर पहाणी क्र., २४०१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५३०८ इ.क्र.२८,पहिला भोईवाडा, मुंबई येथील चुनीलाल बलदेवदास बिल्डिंग
११ अंतिम भुखंड क्र.१६३ टी.पी एस-४ दादर (प) नारायण निवास
१२ भुकर पाहाणी क्र.३३७ /१० दादर माटुंगा प्रेम गंगा
१३ भुकर पाहाणी क्र.१५९अे / १० माटुंगा विभाग रमा कुंज
१४ भुकर पाहाणी क्र.२५९- परेल शिवडी रामभाऊ वऱ्हाडी चाळ
१५ भुकर पाहाणी क्र.६८८ परेल शिवडी विभाग हीरा शेठ आगरी चाळ
१६ भुकर पाहाणी १९७ / ७४, परेल शिवडी विभाग हसमुख भवन
१७ भुकर पाहाणी क्र.१३७७ भायखळा विभाग रतनबाई बिल्डींग
१८ भुकर पाहाणी क्र.१/१९०२ भायखळा विभाग साबुवाला बिल्डींग
१९ भुकर पाहाणी क्र.२०८३ भुलेश्वर विभाग सी ४२६९-७० व ४२७१ श्री.सिद्धपूर सेवासदन
२० भुकर पाहाणी क्र.१२१६ गिरगाव विभाग सुपारीवाला मेन्शन
२१ भुकर पाहाणी क्र.१८४७ भायखळा विभाग इ.क्र.२०-२०ए, ३०-३२ आणी ३४ जेल रोड ब विभाग
२२ भुकर पाहाणी क्र.३/ ७४ परेल शिवडी विभाग अबू मॅन्शन
२३ अंतिम भुखंड क्र.५०-टी.पी.एस. माहीम, शिवाजी पार्क हाऊस
२४ भुकर पाहाणी क्र ५६/१० माटुंगा विभाग गोवींद निवास
२५ भुकर पाहाणी क्र.९४३ फोर्ट विभाग गोलालेन, रति हाऊस

सचिव यांनी उपरोक्त.२५ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबद्दल माहिती देण्याची सुचना केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवून विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या तरतुदी वैध ठरविल्या आहेत. आता ज्या तरतुदी आहेत त्या तशाच ठेवण्यास परवानगी दिली आहे.

मा. सभापती यांनी अंतिम भुखंड क्र.१०६३, टी.पी.एस-४ माहीम विभाग वाकडी चाळ बाबत अशी सूचना केली की, ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. पुनर्विकासास ७०% रहिवाशांची संमती मिळाली असल्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित न ठेवता मंजूर करण्यात यावा. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी सदर पुनर्विकासाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीची शहानिशा करुन तक्रारीत तथ्य नसेल तर प्रस्ताव मंजूर करण्यात येईल अन्यथा प्रस्ताव नामंजूर करण्यात येईल अशी माहिती दिली.

सविस्तर चर्चेअंती उर्वरित ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : १११/९१७**

मुंबई बेटावरील खालील २५ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ अंतिम भुखंड क्र.१०६३, टी.पी.एस-४ माहीम विभाग वाकडी चाळ ✗
२ भुकर पाहाणी क्र.६००/१०, प्लॉट क्र.७७९, माटुंगा विभाग दारुवाला हाऊस
३ भुकर पाहाणी क्रमांक ३/१६३४ भायखळा विभाग मोतलीबाई स्ट्रिट
४ भुकर पाहाणी क्र.६०८ आणि ६०९ गिरगाव मुन्शी बिल्डींग
५ भुकर पाहाणी क्र.१०४६ आणि १०४७ खेतवाडी मिर्झा बिल्डींग
६ भुकर पाहाणी क्र.१४१२ आणि १४१३ भायखळा विभाग सैफी मंझील आणि मुर्तुजा मंझील
७ भुकर पाहाणी क्र.१८११ आणि १८१२ भायखळा विभाग जरीवाला बिल्डींग व कुडुसकर बिल्डींग
८ भुकर पाहाणी क्र.१७९४ माहीम विभाग, डॉ.एम.बी.राऊत रोड दादर (प) मुंबई नंदादिप बिल्डींग
९ भुकर पहाणी क्र.१६८ / ७४ परेल शिवडी विभाग, "कावराना बिल्डींग"

१० भुकर पहाणी क्र., २४०१, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५३०८ इ.क्र.२८,पहिला भोईवाडा, मुंबई येथील चुनीलाल बलदेवदास बिल्डिंग
११ अंतिम भुखंड क्र.१६३ टी.पी एस-४ दादर (प) नारायण निवास
१२ भुकर पाहाणी क्र.३३७ /१० दादर माटुंगा प्रेम गंगा
१३ भुकर पाहाणी क्र.१५९अे / १० माटुंगा विभाग रमा कुंज
१४ भुकर पाहाणी क्र.२५९- परेल शिवडी रामभाऊ वऱ्हाडी चाळ
१५ भुकर पाहाणी क्र.६८८ परेल शिवडी विभाग हीरा शेठ आगरी चाळ
१६ भुकर पाहाणी १९७ / ७४, परेल शिवडी विभाग हसमुख भवन
१७ भुकर पाहाणी क्र.१३७७ भायखळा विभाग रतनबाई बिल्डींग
१८ भुकर पाहाणी क्र.१/१९०२ भायखळा विभाग साबुवाला बिल्डींग
१९ भुकर पाहाणी क्र.२०८३ भुलेश्वर विभाग सी ४२६९-७० व ४२७१ श्री.सिद्धपूर सेवासदन
२० भुकर पाहाणी क्र.१२१६ गिरगाव विभाग सुपारीवाला मेन्शन
२१ भुकर पाहाणी क्र.१८४७ भायखळा विभाग इ.क्र.२०-२०ए, ३०-३२ आणी ३४ जेल रोड ब विभाग
२२ भुकर पाहाणी क्र.३/ ७४ परेल शिवडी विभाग अबू मॅन्शन
२३ अंतिम भुखंड क्र.५०-टी.पी.एस. माहीम, शिवाजी पार्क हाऊस
२४ भुकर पाहाणी क्र ५६/१० माटुंगा विभाग गोवींद निवास
२५ भुकर पाहाणी क्र.९४३ फोर्ट विभाग गोलालेन, रति हाऊस

---------------------------oo---------------------------

[illegible]

**बाब क्रमांक १११/५**

विषय- अ) दक्षिण परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १४५ ते १५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उत्तर परीमंडळातील २१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२,९२,०९,३८५/- व निव्वळ रक्कम रु. १,१४,९८,९३०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १११/९१८**

उत्तर परीमंडळातील एकूण २१.उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १११/५**

**ब)** विषय- भाग्यश्री इमारत, २रा पारसीवाडा, डी. विभाग या इमारतीच्या दुरुस्ती अंदापत्रकास मंजूरी देण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्ताव तात्पुरता स्थगित करावा व सखोल माहितीसह मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक १११/६**

विषय- ३३ डी ई अेफ, मुगभाट क्रॉस लेन डी विभाग भुकर पाहाणी क्र.३६४, ३६३ व ३६० गिरगाव विभाग इमारतीची पुनर्रबांधणी

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर योजनेवर विस्तृत चर्चा होऊन सर्वानुंमते सदर संयुक्त पुनर्बांधणी योजनेस मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक १११/ ९१९**

३३ डी ई अेफ, मुगभाट क्रॉस लेन डी विभाग भुकर पाहाणी क्र.३६४, ३६३ व ३६० गिरगाव विभाग या पुनर्बांधणी योजनेस रु. १२,५००/- चौ.मी.प्रमाणे रु.१,८२,५००/- या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

---

५८.

**<u>बाब क्रमांक १११/६</u>**

विषय- इ.क्र.२७-३५ कामाठीपुरा, १३ वी गल्ली, ई.विभाग भुकर पाहाणी क्र ४६२ ते ४६६ भायखळा विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर विस्तृत चर्चा होऊन सर्वानुमते सदर संयुक्त पुनर्बांधणी योजनेस मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक १११/ ९२०</u>**

इ.क्र.२७-३५ कामाठीपुरा, १३ वी गल्ली, ई.विभाग भुकर पाहाणी क्र ४६२ ते ४६६ भायखळा विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता या पुनर्बांधणी योजनेस रु. १२,५००/- चौ.मी.प्रमाणे रु.२,०२,३६,५००/- या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

---

**आयत्या वेळेचे विषय**

**<u>बाब क्रमांक १११/७</u>**

१) विषय- दक्षिण परीमंडळातील प्रस्तावित दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मानयता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव

---

आयत्यावेळच्या विषयांमध्ये उपरोक्त प्रस्ताव १८१ ते १९९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. ६,८८,६३,२६८/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३,४५,२४,१५१/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक १११/ ९२१</u>**

दक्षिण परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १११/७**

२) अ) विषय- उत्तर परीमंडळातील प्रस्तावित दुरुस्ती कामाच्या मुळ व सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मानयता प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २०१ ते २१७ वर सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी एकूण रक्कम रु. ८,७७,६५,१४५/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ४,३९,२५,९३३/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १११/ ९२२**

उत्तर परीमंडळातील ३८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १११/७**

२) ब) विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारत ६६,देशपांडे बिल्डिंग,रानडे रोड, दादर या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामात सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २१९ ते२२३ वर सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती उपरोक्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक १११/ ९२३</u>**

उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारत ६६,देशपांडे बिल्डिंग,रानडे रोड, दादर या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामात सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक १११/७</u>**

3) विषय- मुंबई बेटावरील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अंतर्गत येणा-या जून्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या दराबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.२२५ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला. चर्चेअंती दुरुस्तीची कामे दर्जेदार होण्यासाठी व दिवसेंदिवस सर्व वस्तुंवर होणारी भाव वाढ लक्षात घेऊन सुधारित दरसूची बाजारभावाप्रमाणे सुधारित करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक १११/ ९२४</u>**

सुधारित दरसूची बाजारभावाप्रमाणे सुधारित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---

मा. सदस्य श्री.बशीर पटेल यांनी अशी सूचना केली की, काही ठेकेदार कामाचा दर्जा राखत नाहीत.ठेकेदार काम समाधानकारक करीत नसल्यामुळे रहिवाशांना त्रास होत असतो. म्हणून पी.डब्ल्यू.डी. धर्तीवर ठेकेदारांनी कामाचा दर्जा राखण्यासाठी ठेकेदारांवर बंधन टाकले पाहिजे किंवा ठेकेदारांची वर्गवारी ठरविण्यात आली पाहिजे. किंवा त्यांच्याकडून रु.५ लाख किंवा काही सेक्युरिटी डिपॉझिट घेणे योग्य राहील. म्हणजे जर तक्रार आली तर ते पैसे कापून घेऊन त्यामध्ये काम करणे शक्य होईल.

यावर मा. मुख्य अधिकारी यांनी अशा सूचना किल्या की, नोंदणीकृत ठेकेदाराची जी यादी आहे त्या यादीची प्रत मा. सदस्यांना देण्यात यावी. ज्या कामासाठी जे ठेकेदार पात्र ठरविण्यात आले आहेत ते खरोखरच त्या कामासाठी पात्र आहेत का ? त्यांच्याकडे तेवढे मन्जूर

आहेत का ? त्यांच्याकडे मशिनरी उपलब्ध आहे का ? त्यांची आर्थिक कुवत आहे का ? या सर्व बाबी पाहूनच यादी बनविण्यात आली पाहिजे. जे अनरिझनेबल दर भरतात अशा ठेकेदारांना काम मिळता कामा नये याची काळजी अधिका-यांनी घेतली पाहिजे.

यावर मा. सभापती यांनी पुनर्रचनेची इतकी वाईट कामे केलेली आहेत त्याचा परिणामा आपणा सर्वांना भोगावा लागतो असे निदर्शनास आणून सर्व उपमुख्य अभियंता यांनी विषयाबाबत मा. मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.असे मत व्यक्त केले.

मा.सदस्य श्री. हेमराज शहा यांनी मा. मुख्य अधिकारी यांच्याकडे पत्र पाठवूनही त्यांची पोचपावती किंवा उत्तर देण्यात आलेले नाही अशी तक्रार करुन सूचना केली की, अधिका-यांना पाठविलेल्या पत्राचे उत्तर देण्यात आले पाहिजे. यावर सचिव यांनी अशी माहिती दिली की, मा. मुख्य अधिकारी यांच्याकडे पत्र आल्यानंतर ते संबंधित विभागाकडे पाठविले जाते.

श्री. त्रिवेदी, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, स्टील व सिमेंटचे बाजार भाव आहेत शेडयुल्ड रेट, मार्केट रेट व आजचा रेट विचारात घेऊन जी रेट लिस्ट बनविली आहे तिली मान्यता देण्याबाबत विनंती केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी चालू असलेल्या कामासाठी आपण वेगळा ठराव करुन प्राधिकरणाकडे पाठविण्यात येणार असून नवीन कामासाठी प्राधिकरणाने ~~जी~~ एक्सलेशन ~~कॉस्ट~~ ~~ठरविली~~ आहे त्यानुसार एक्सलेशन ~~कॉस्ट~~ लागू करावयाची आहे. यावर दुरुस्तीच्या कामासाठी एक्सलेशन ~~कॉस्टची~~ गरज नसल्याचे श्री. त्रिवेदी, उ.मु.अभियंता यांनी सांगितले.

मा. सभापती यांनी सूचना केली की, ~~दरसूची बाबत~~ जो प्रस्ताव सादर करण्यात आला आहे त्यास आजच्या बैठकीत तत्वतः मंजूरी देण्यात येत असून ~~पुढील प्रोसेस~~ करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. शिरिषकर यांनी सत्यम शिवम सुंदरम या इमारतीसमोर अतिक्रमण करण्यात येऊन चहाचे दुकान, इस्त्रीचे दुकान टाकण्यात आले आहे. त्याबाबत रहिवाशांनी त्यांच्याकडे तक्रार केली व त्यांनी सदर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांच्या निदर्शनास आणून देखील अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही अशी तक्रार केली.

यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी असा खुलासा केला की, सदर ठिकाणी उप अभियंता गेले असता सदर अनिवासी बांधकामे जूनी असल्याचे त्यांना कळले

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांसाठी इन्शुरन्स एजन्सी नेमण्याबाबत सूचना केली होती त्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. तरी याबाबत लवकरच निर्णय घेण्यात यावा अशी विनंती केली.

मा. सदस्य श्री. बांदिवडेकर यांनी अशी सूचना केली की पुनर्विकासासाठी मंडळ जेव्हा नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर मंडळाची जबाबदारी काय राहते ? काही विकासक ना हरकत

प्रमाणपत्र मिळाल्यानंतर इमारत खाली करतात परंतु पाडून टाकत नाहीत. उदा. परेल येथील दळवी इमारत खाली केली व कालांतराने ती कोसळली. सुदैवाने काही अपघात झाला नाही. अन्यथा पादचारीसुध्दा अपघातात सापडू शकतो. तर त्याची जबाबदारी मंडळावर आली असती. यावर मा. सभापती यांनी खुलासा केला की, सदरची जबाबदारी संबंधित विकासकावर आली असती. मंडळाकडून विकासकाला ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर म.न.पा.कडूनही ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते व त्यास विलंब होतो.

श्री. त्रिवेदी,उपमुख्य अभियंता यांनी दळवी इमारतीचे रहिवाशी न्यायालयात गेल्यामुळे इमारत पाडण्यासाठी स्थगिती होती अशी माहिती दिली.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, जो शासन निर्णय आला आहे तो ३३ (७) साठी आहे. त्यामध्ये ३३ (९) चा उल्लेख करण्यात आला नाही. विधानसभेत सदर बील सर्व आमदारांनी एकमताने मंजूर केले. याबाबत त्यांनी मा.श्री. राजेश टोपे यांच्याशी बैठक घेऊन ३३ (९) समाविष्ट करण्याबाबत चर्चा केलेली आहे तसेच संबंधित अधिका-यांशी चर्चा केलेली आहे. मालमत्ता कराच्या बिलाचा विषय त्यामध्ये घालण्यात आला आहे. त्यांनी मालमत्ता कराचा विषय हा वेगळा विषय असून तो वगळण्यात यावा अशी त्यांना विनंती केली आहे. परंतु त्यांना तसा अधिकार नसून त्यासाठी विधानसभा अध्यक्षांची मान्यता घ्यावी लागेल. त्यांची परवानगी मिळाल्यानंतर वे वेगळा कायदा करु शकतात. अशाप्रकारे किचकट असले तरी मार्ग काढण्याच्या दृष्टीने पाठपुरावा चालू आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मुळ विधेयक जे मंजूर झाले आहे त्यामध्ये ३३ (७) चा उल्लेख आलेला आहे. त्यामुळे शासन निर्णयामध्ये पुनर्रचित इमारतीबाबत उल्लेख असला तरी शासनाकडून खुलासा होणे आवश्यक आहे व कायद्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी उपकर पात्र इमारतीच्या रेकॉर्ड मंडळाकडे उपलब्ध नाही म्हणून संगणकीकृत रेकॉर्ड करण्यात यावा यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, उपकरपात्र इमारतींची यादी मंडळाकडे उपलब्ध आहे परंतु तपशीलवार माहिती उदा. इमारत कधी दुरुस्त झाली, सेस किती गोळा झाला आहे, मालक कोण आहे, इमारत किती मजल्यांची आहे, रहिवाशी किती आहेत, प्लॉट एरिया किती आहे याची माहिती उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे.. दुरुस्ती केलेलया इमारतीची बरीचशी माहिती उपलब्ध आहे परंतु ती एकत्रित स्वरुपात अशी नाही. म्हणून १६५०० इमारतींची आवश्यक ती सर्व माहिती गोळा करुन ती बेवसाईटवर टाकायची आहे. त्यासाठी एक विशेष सॉफ्टवेअर विकसित केलेले आहे. त्यासाठी एक एजन्सी नेमवयाची असून टेंडर डॉक्युमेंट तयार करण्यासाठी टी.सी.एस.च्या कर्मचा-यांची मदत घेण्यात येत आहे. त्यांच्याबरोबर बैठका झाल्या असून कार्यवाही सुरु आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, दिवाळी जवळ आली असून भूमिपूजन करण्याची रहिवाशांची इच्छा आहे. म्हणून सदर बैठकीस जोडून लवकरच बैठक घेण्यात यावी व आयत्यावेळचे विषय सदर बैठकीत समाविष्ट करावेत अशा सूचना मा. सभापती यांनी दिल्या

मा. सभापती यांनी बैठकीच्या अखेरीस सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

निवासी सचिव
इ.व दु. मंडळ

मा.मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २००८ रोजी झालेल्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १११ वी जोड बैठक शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २००८ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.हेमराज शहा | गैरहजर |
| ११) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १२) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १३) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १६) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १७) | मा. श्री. दिलीप शिंदे,उपसचिव,गृ.नि.विभाग | निमंत्रक |
| १८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १९) | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व मा. सदस्यांना व अधिका-यांना दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या व सचिव यांना बैठक चालू करण्याच्या सूचना दिल्या.

मंडळाचे सचिव यांनी मा.सभापती व मा. सदस्य यांचे स्वागत करुन मंडळाची १११ वी जोडबैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले

**बाब क्रमांक : १११/१ जोड बैठक**

विषय- मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१. भुकर पहाणी क्र.५६८ / ६, सायन विभाग, प्लॉट क्र.२६८, उपकर क्र.फ उ / ५३२८ (१) इ.क्र.२५६९, सायन रोड क्र.३१ मुंबई -२२, धीरेंद्र मॅन्शन, या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पाहाणी क्र.६६० गिरगाव विभाग मनियार बिल्डींग

३. भुकर पहाणी क्र२१७- लोअर परेल विभाग, इमारत क्र.५८ सी, ५८ बी, ५६-५८ व ६०-६२, उपकर क्र.गउ / २०६० (१), २०६० ( १बी,बी), २०६० (१बी), २०६० (१अे) सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल,

४. भुकर पहाणी क्र.५६८ / ६, सायन विभाग, प्लॉट क्र.२६८, उपकर क्र.फ उ / ५३२८ (१) इ.क्र.२५६९, सायन रोड क्र.३१ मुंबई -२२, धीरेंद्र मॅन्शन, या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. अंतिम भुखंड ५३५- टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.१४१-१४१अे, उपकर क्र.ग उ/ ३५८०, भवानी शंकर रोड, दादर (प) मुंबइ ४०० ०२८ विसावा बिल्डींग या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. अंतिम भुखंड क्र. ७६ टी.पी.एस-४ माहीम विभाग इमारत क्र.१५ व १५अ उपकर क्र.ग ड / ४२५६ (१) व ग ड / ४२५६ ( १ अे) आर.के.वैद्य रोड, दादर ( प) मुंबई -२८ रामकुंज या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. भुकर पहाणी क्र. ४१२, १/४१२, २/४१२, ३/४१२, ४/४१२ आणि ४ए/४१२ माझगांव विभाग, इमारत क्र.१७०-१९२, १७०ए & १५६डी, मुंबई मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.७३५-अे,दादर माटुंगा विभाग, उपकर क्र.फउ /७०३४( २-२अे) इ.क्र.५१९-अे, आर-पी मसानी रोड, माटुंगा, मुंबई-१९ "मोती बाग" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९. भुकर पहाणी क्र.१०८/१७२१ मांडवी विभाग, उपकर क्र.ब-४१९५(३) व ब-४१९५(३अ), इ.क्र.५८-६२ डॉ महेश्वरी रोड (६० महेश्वरी रोड) आणि २एफ-२आय (४-४डी) नवरोजी हिल रोड, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१०. भुकर पहाणी क्र.१८३९ माहीम विभाग प्लॉट क्र.१२९ उपकर क्र.जी उ / ४८८४ (६) इ.क्र.४५, डॉ.एम.बी.राउत रोड, दादर (प), मुंबई -२८, "श्रीकृपा" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११. भुकर पहाणी क्र. १००/७४ परेल शिवडी विभाग उपकर क्र. फद/५६७ (१) इ.क्र.१७ परमार गुरुजी मार्ग, परेल, मुंबई-१२, सुषमा सदन मुंबई येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२. भुकर पहाणी क्र.२०२९ भायखळा विभाग, इ.क्र. ५४७-५४९, ५४७बी आणि ५४७सी-५४७डी, ना. म. जोशी मार्ग, भायखळा, मुंबई येथील ''लक्ष्मी भुवन'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१३. भुकर पहाणी क्र.७७ टी.पी.एस -४ माहीम विभाग, इमारत क्र.१५-अे, उपकर क्र.जीउ / ४२५५, आर.के.वैद्य रोड, दादर (प) मुंबई -२८ "तांबे इमारत" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

१४. भुकर पहाणी क्र.२०३९, मांडवी विभाग,उपकर क्र.४२६७ व ४२६८ (१) इ.क्र.१९, डॉ.महेश्वरी रोड या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

१५. भुकर पहाणी क्र.५३८, गिरगाव विभाग उपकर क्र.डी-८९३ ( १-२) इ.क्र.११६-२६, २२-२४ब ,खाडिलकर रोड व सदाशिव क्रॉस लेन मुंबई येथिल मालमत्तेच्या पुर्नविकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

१६. भुकर पहाणी क्र.१ए / १८८८ भायखळा विभाग, उपकर क्र.इ-४४४१-४४ इ.क्र.३७५, साने गुरुजी मार्ग मुंबई येथिल " राम निवास को हौ.सोसायटी " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

---------------------------------oo---------------------------------

सचिव यांनी उपरोक्त.१६ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

सविस्तर चर्चेअंती उपरोक्त.१६ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक : १११/ ९२५**

मुंबई बेटावरील खालील १६ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१. भुकर पहाणी क्र.५६८ / ६, सायन विभाग, प्लॉट क्र.२६८, उपकर क्र.फ उ / ५३२८ (१) इ.क्र.२५६९, सायन रोड क्र.३१ मुंबई -२२, धीरेंद्र मॅन्शन, या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ''ना हरकत प्रमाणपत्र'' प्रदान करण्याबाबत.

२. भुकर पाहाणी क्र.६६० गिरगाव विभाग मनियार बिल्डींग

३. भुकर पहाणी क्र२१७- लोअर परेल विभाग, इमारत क्र.५८ सी, ५८ बी, ५६-५८ व ६०-६२, उपकर क्र.गउ / २०६० (१), २०६० ( १बी,बी), २०६० (१बी), २०६० (१अे) सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल,

४. भुकर पहाणी क्र.५६८ / ६, सायन विभाग, प्लॉट क्र.२६८, उपकर क्र.फ उ / ५३२८ (१) इ.क्र.२५६९, सायन रोड क्र.३१ मुंबई -२२, धीरेंद्र मॅन्शन, या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. अंतिम भुखंड ५३५- टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.१४१-१४१अे, उपकर क्र.ग उ/ ३५८०, भवानी शंकर रोड, दादर (प) मुंबइ ४०० ०२८ विसावा बिल्डींग या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. अंतिम भुखंड क्र. ७६ टी.पी.एस-४ माहीम विभाग इमारत क्र.१५ व १५अ उपकर क्र.ग ड / ४२५६ (१) व ग ड / ४२५६ ( १ अे) आर.के.वैद्य रोड, दादर ( प) मुंबई -२८ रामकुंज या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. भुकर पहाणी क्र. ४१२, १/४१२, २/४१२, ३/४१२, ४/४१२ आणि ४ए/४१२ माझगांव विभाग, इमारत क्र.१७०-१९२, १७०ए & १५६डी, मुंबई मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भुकर पहाणी क्र.७३५-अे,दादर माटुंगा विभाग, उपकर क्र.फउ /७०३४( २-२अे) इ.क्र.५१९-अे, आर-पी मसानी रोड, माटुंगा, मुंबई-१९ "मोती बाग" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

९. भुकर पहाणी क्र.१०८/१७२१ मांडवी विभाग, उपकर क्र.ब-४१९५(३) व ब-४१९५(३अ), इ.क्र.५८-६२ डॉ महेश्वरी रोड (६० महेश्वरी रोड) आणि २एफ-२आय (४-४डी) नवरोजी हिल रोड, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१०. भुकर पहाणी क्र.१८३९ माहीम विभाग प्लॉट क्र.१२९ उपकर क्र.जी उ / ४८८४ (६) इ.क्र.४५, डॉ.एम.बी.राउत रोड, दादर (प), मुंबई -२८, "श्रीकृपा" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

११. भुकर पहाणी क्र. १००/७४ परेल शिवडी विभाग उपकर क्र. फद/५६७ (१) इ.क्र.१७ परमार गुरुजी मार्ग, परेल, मुंबई-१२, सुषमा सदन मुंबई येथील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१२. भुकर पहाणी क्र.२०२९ भायखळा विभाग, इ.क्र. ५४७-५४९, ५४७बी आणि ५४७सी-५४७डी, ना. म. जोशी मार्ग, भायखळा, मुंबई येथील "लक्ष्मी भुवन" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३. भुकर पहाणी क्र.७७ टी.पी.एस -४ माहीम विभाग, इमारत क्र.१५-अे, उपकर क्र.जीउ / ४२५५, आर.के.वैद्य रोड, दादर (प) मुंबई -२८ "तांबे इमारत" या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१४. भुकर पहाणी क्र.२०३९, मांडवी विभाग,उपकर क्र.४२६७ व ४२६८ (१) इ.क्र.१९, डॉ.महेश्वरी रोड या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत

१५ भुकर पहाणी क्र.५३८, गिरगाव विभाग उपकर क्र.डी-८९३ ( १-२) इ.क्र.११६-२६, २२-२४ब ,खाडिलकर रोड व सदाशिव क्रॉस लेन मुंबई येथिल मालमत्तेच्या पुर्नविकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

१६ भुकर पहाणी क्र.१ए / १८८८ भायखळा विभाग, उपकर क्र.इ-४४४१-४४ इ.क्र.३७५, साने गुरुजी मार्ग मुंबई येथिल " राम निवास को हौ.सोसायटी " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुर्नविकासाकरीता " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान करण्याबाबत.

---oo---

**बाब क्रमांक १११/२ जोड बैठक :-**

अ विभागांतर्गत इमारत क्र. १४९ शहिद भगतसिंग रोड या उपकरप्राप्त इमारतींच्या दुस-या सुधारित टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या प्रशासकीय मंजूरीप्राप्त रक्कमे वरील झालेल्या जास्त खर्चाच्या (रु. १२००/प्रती चौ. मी. मर्यादेत) रक्कमेस मंजूरी देणेबाबत.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

<u>ठराव क्र. १११/९२६</u>

'अ' विभागांर्तगत इमारत क्र. १४९ शहिद भगतसिंग रोड या उपकरप्राप्त इमारतीच्या दुस-या सुधारित टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या प्रशासकीय मंजूरी प्राप्त रक्कमेवरील झालेल्या जास्त खर्चास सर्वानुमते (रु. १२००/ प्रति चौ. मी. मर्यादित) सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---xx---

**बाब क्रमांक १११/३**

विषय- **म्हाडा अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव.**

१) इमारत क्र. १४९ रशिद मेंशन क्र. १ शहिद भगतसिंग रोड, उपकर क्र. अ-२०५ (१),
२) इमारत क्र. १४९ अ, रशिद मेंशन क्र. २, शहिद भगतसिंग रोड, उपकर क्र. अ-२०५ (२)

------------------------------

सदर प्रस्ताव मान्यतेसाठी आयत्यावेळी सादर करण्यांत आले. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन सर्वानुमते उपरोक्त दोन इमारतींना ८८ (३) अ प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्र. १११/९२७**

१. इमारत क्र. १४९ रशिद मेंशन क्र. १, शहिद भगतसिंग रोड, उपकर क्र. अ-२०५ (१).

२. इमारत क्र. १४९-अ, रशिद मेंशन क्र. २, शहिद भगतसिंग रोड, उपकर क्र. अ-२०५ (२).

---

**बाब क्रमांक १११/४ जोड बैठक**

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ५३ ते ६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

उत्तर परीमंडळातील ५५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु ८,०९,०१,५७५ /- व निव्वळ रक्कम रु.३,९४,०९,६७३ /- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १११/ ९२८**

उत्तर परीमंडळातील एकूण ५५ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय

मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---xox---

**बाब क्रमांक १११ /ड जोड बैठक**

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव

ठराव क्र- १११/८२९

---

दक्षिण परीमंडळातील ०९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु १,८५,२५,२६८ /- व निव्वळ रक्कम रु.९५,०३,२१८ /- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक १११/ई जोड बैठक (पुनर्रचना विभाग)**

विषय- इ.क्र.१५-१५ अे व १७, बोरभाट लेन, (क्रांतीविर राजगुरु मार्ग), डी.विभाग संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ६५ ते ६७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर विस्तृत चर्चा होऊन सर्वानुंमते सदर संयुक्त पुनर्बांधणी योजनेस मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक १११/ ~~९२७~~** ८३०

इ.क्र.१५-१५ अे व १७, बोरभाट लेन, (क्रांतीविर राजगुरु मार्ग), डी.विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता रु १२,५००./- प्रति चौ.मी.प्रमाणे रु.१,४९,८८,८७५./- या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

---xx---

मा. सभापती यांनी बैठकीच्या अखेरीस सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

29/10/08

निवाअ / सचिव
मुं इ दु व पु मंडळ

मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.सभापती/मुं.इ.दु.व पु.मंडळ